# विषयसूची


१. वारकरी संप्रदायानुसार साधना करून प्रवचनांद्वारे समाजप्रबोधन करणारे पू. (ह.भ.प.) सखाराम बांद्रे महाराज ! ४

२. ईश्वरी कृपेने मिळणारे अनमोल ज्ञानधन सनातनला अर्पण करणारे पू. (ह.भ.प.) सखाराम बांद्रे महाराज ! ७

३. पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज यांची स्वतःच्या लिखाणाबद्दल नम्रता ! १०

४. पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज यांना 'स्वतःचे ग्रंथ परात्पर गुरु डॉ. आठवले प्रसिद्ध करतील', याची वाटणारी निश्चिती ! ११

५. पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज यांचे लिखाण संकलित करणाऱ्या साधिकेला पू. बांद्रे महाराज यांची लक्षात आलेली गुणवैशिष्ट्ये ! १२

६. पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज यांनी परात्पर गुरु डॉ. आठवले यांची वर्णिलेली महती आणि त्यांच्याप्रती व्यक्त केलेली कृतज्ञता ! १४

७. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले यांचे अद्वितीय कार्य आणि वैशिष्ट्ये यांचा संक्षिप्त परिचय ! १६

८. प्रकरणे

   १. मनुष्य आणि त्याचे चार देह १८

   २. मनुष्य आणि सुख-दुःख ३४

   ३. मनुष्य आणि कर्मयोग ४८

   ४. मनुष्य आणि भक्तीयोग ६०



सनातनच्या ग्रंथांच्या 'ऑनलाईन' खरेदीसाठी

**SanatanShop.com**

मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तेलुगु, तमिळ आणि मल्ल्याळम् या भाषांतील ग्रंथ उपलब्ध !



## विषयसूचीतील क्रमांक २

# ईश्वरी कृपेने मिळणारे अनमोल ज्ञानधन सनातनला अर्पण करणारे पू. (ह.भ.प.) सखाराम बांद्रे महाराज !

'खेळ मांडियेला वाळवंटी घाई । नाचती वैष्णव भाई रे ।।', अशा अभंगओळी नुसत्या कानावर पडल्या, तरी आठवण होते चंद्रभागेची, पंढरीच्या विठुरायाची आणि त्याच्या समोर नतमस्तक झालेल्या असंख्य वारकऱ्यांची ! 'वारकरी संप्रदाय' म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा मुकुटमणीच ! अशा थोर संप्रदायातीलच एक संत म्हणजे, रत्नागिरी जिल्ह्यातील सुप्रसिद्ध प्रवचनकार पू. (ह.भ.प.) सखाराम रामजी बांद्रे महाराज !

## पू. (ह.भ.प.) सखाराम बांद्रे महाराज यांचा व्यासंग !

पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज यांचा रामायणासारखे ग्रंथ आणि संतचरित्रे यांचा गाढा अभ्यास आहे. महाराजांना गेल्या काही वर्षांपासून ईश्वराकडून सूक्ष्मातून अध्यात्मातील विविध विषयांवर ज्ञानही मिळत आहे. या दोन्ही ज्ञानांचा ते त्यांच्या प्रवचनांत वापर करतात. त्यामुळे त्यांची प्रवचने अप्रतिम होतात आणि प्रवचनांना आलेल्यांना त्यातून पुष्कळ शिकायला मिळते.

## ईश्वराकडून मिळणारे अमूल्य ज्ञान सनातनला अर्पण करणारे पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज !

हिंदु संस्कृतीत विद्या हे मोठे धन आहे. महाराजांना ईश्वराकडून मिळत असलेले अनमोल अध्यात्मज्ञान पहाता महाराज हे खऱ्या अर्थाने धनवान आहेत ! त्यांना मिळालेले हे ज्ञान त्यांनी २६ वह्यांत लिहिलेले आहे.

व्यावहारिक जगातील ज्ञानही सहजासहजी आणि तेही विनामूल्य कोणी कोणाला देत नाही. महाराजांचे आगळे वैशिष्ट्य म्हणजे, त्यांनी त्यांना मिळालेले सर्व ईश्वरी ज्ञान सनातन संस्थेला अर्पण केले आहे. महाराजांच्या मनाचा हा केवढा मोठेपणा !

## पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराजांना मिळणाऱ्या ज्ञानाच्या ग्रंथांची वैशिष्ट्ये !

पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराजांना मिळणाऱ्या ज्ञानाची ग्रंथमालिका आम्ही संकलित करत आहोत. प्रस्तुत ग्रंथ हा या मालिकेतील पहिला ग्रंथ आहे. महाराजांना मिळणाऱ्या ज्ञानाची लक्षात आलेली काही वैशिष्ट्ये पुढे दिली आहेत.

१. मी आतापर्यंत अध्यात्मावर बरेच ग्रंथ लिहिले आहेत. महाराजांना मिळणारे ज्ञान वाचल्यावर माझ्या लक्षात आले की, मी लिहिलेले ग्रंथ हे विज्ञानाच्या रुक्ष भाषेत आहेत, तर महाराजांचे लिखाण सर्वसामान्य जनतेला कळेल, अशा प्रासादिक भाषेत आहे.

२. महाराजांचे लिखाण हे सर्वसामान्यांना 'आपलेसे' वाटेल अशा बोलीभाषेत आहे. त्यामुळे वाचक त्या लिखाणातील ज्ञानानुसार आचरण करण्यास लवकर उद्युक्त होईल.

३. महाराजांचे अधिकांश लिखाण हे अनेक साधकांना उपयोगी पडेल, अशा भक्तीयोगातील आहे. त्यामुळे ते भावपूर्णही आहे.

४. सर्वसामान्य लोकांना प्रतिदिन सांसारिक जीवन जगतांनाही अध्यात्माची कास कशी धरता येते, याविषयीही महाराजांनी सोपे मार्गदर्शन केले आहे, उदा. फावल्या वेळेत अनावश्यक गप्पा न मारता देवाचे नामस्मरण करा. 'मनुष्याने त्याला लाभलेल्या अमूल्य अशा नरदेहाचे सार्थक करून घ्यावे', ही कळकळ महाराजांच्या लिखाणात ठायी ठायी जाणवते. नोकरी नसल्याने घरी बसून वेळ वाया घालवणाऱ्या युवकांनाही ते संदेश देतात, 'अरे, नुसते घरी बसू नका, तर लहानसा का होईना, काहीतरी धंदा करा अथवा देवाची उपासना करा; पण हा नरदेह सार्थकी लावा !'

५. महाराज स्वतः संत असल्याने, तसेच त्यांना मिळणारे ज्ञान हे ईश्वरी ज्ञान असल्याने त्यांच्या लिखाणात चैतन्य आहे. अशा चैतन्ययुक्त

ज्ञानाचा संस्कार वाचकांच्या मनावर लवकर झाल्याने ते साधनेकडे लवकर वळतात. हे लक्षात घेऊन महाराजांच्या लिखाणातील चैतन्य अल्प न होण्याकरता आम्ही त्यांच्या लिखाणाच्या भाषेत किंवा शब्दांत विशेष पालट केले नाहीत.

## अत्यंत निरिच्छ वृत्तीचे पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराज !

पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराजांनी त्यांच्या ज्ञानाच्या वह्या सनातनला दिल्याच; पण त्या देऊन काही महिने झाले, तरी त्यांनी 'या ज्ञानाचे माझे ग्रंथ कधी प्रसिद्ध होतील ?', असे एकदाही विचारले नाही. महाराजांनी त्या वह्या सनातनला दिल्या, तेव्हाच जणू त्यांनी त्या पांडुरंगाच्या चरणी समर्पित केल्या!

या ग्रंथांतील सर्व लिखाण पू. बांद्रे महाराज यांनी लिहिलेले असल्याने ग्रंथांवर 'लेखक' म्हणून त्यांचे नाव लिहिले आहे. मी त्यांच्या ज्ञानाचे संकलन करून ग्रंथस्वरूपात प्रसिद्ध करत असल्याने ग्रंथांवर माझे नाव 'संकलक' म्हणून लिहिले आहे. 'ग्रंथांवर माझे नाव 'संकलक' म्हणून घालू शकतो का ?', असे महाराजांना विचारल्यावर त्यांनी त्यासाठी आनंदाने अनुमती दिली.

अशा निरिच्छ वृत्तीच्या महाराजांकडून केवळ साधकांनाच नव्हे, तर संतांनाही बरेच काही शिकण्यासारखे आहे.

## प्रार्थना !

'पू. (ह.भ.प.) बांद्रे महाराजांनी लिहिलेल्या या ग्रंथमालिकेचा वाचक, साधक, तसेच महाराजांचे अनुयायी आणि भक्त यांना साधनेसाठी अधिकाधिक लाभ करून घेता येऊन त्यांची शीघ्र आध्यात्मिक प्रगती होवो', ही श्री गुरुचरणी प्रार्थना !'

**– (परात्पर गुरु) डॉ. जयंत आठवले (१५.८.२०२१)** F (DW-SmStBaM + BaM-PR 26SDAch)